# MEMORANDUM OF UNDERSTANDING

## BETWEEN

## AVANTA FOUNDATION,CHAHARDI

**Represented by President, Avanta foundation.**

AND

**Bhagini Mandal Chopda's College Of Social Work, Chopda, Dist-Jalgaon**

Represented by the Principal

This **Memorandum of Understanding** is intended to promote international cooperation between the **President,Avanta Foundatio, Chahardi represented by Manoher Dhivare** and Bhagini Mandal Chopda's College Of Social Work, Chopda, Dist-Jalgaon, represented by Principal, Bhagini Mandal chopda's College of social work, chopda recognizing the benefits to their respective institutions from the establishment of institutional links, hereby agree to enter into this agreement for the following purpose.

1. **PURPOSE OF AGREEMENT**

   The purpose of this agreement is to develop academic and educational cooperation, establish a collaborative program in (indicate area of cooperation) between the two institution and to cooperate in their mutual interest for a range of higher educational activities. (**The purpose of agreement is to facilitate placement and field work opportunities )**

2. **AREAS OF COOPERATION**

   Subject to the availability of funds, resources and approval of the authorized representatives or **President, Avanta Foundation, Chopda and the Principal, Bhagini Mandal chopda's College of social work, Chopda, Dist-Jalgaon**, both institutions agree to develop the following collaborative activities Conducting joint research and development project

   a. Cooperation in individual projects
   b. Organization of lectures, symposia, international meetings, conferences and workshops
   c. Provide job placement and Job opportunities to students of college.
   d. Exchange of information, teaching materials, technological and scientific publications
   e. Providing opportunities for professors and researchers to give lectures
   f. Search for opportunities to collaborate in the future

3. **IMPLEMENTATION**

   3.1 All programs or activities implemented under the terms of this Memorandum of Understanding shall be mutually agreed upon in writing, including the necessary budget for the program of activity as the need may arise.

   3.2 Each of the participating institutions shall be fully responsible financially for the activities carried out under its direction or by its staff, except as otherwise agreed by the parties.

   3.3 The parties will designate one officer each who will develop and coordinate specific programs or activities between them.

Scanned with CamScanner

4. **INTELLECTUAL PROPERTY**

Intellectual property rights of work carried out at each partner institution shall normally vest with respective institution.

5. **DURATION AND RENEWAL OF AGREEMENT**

This Memorandum of Understanding will become effective immediately after signature by the representatives of both **Avanta foundation, and Bhagini Mandal Chopda's College of social work, chopda for a period of 2018-2022(4)** Years and is subject to revision of modification by mutual agreement.

6. **AMENDMENTS**

6.1 This Memorandum of Understanding may be amended by a written agreement signed by the representatives of both universities.

6.2 In the event of any unforeseen incident during collaborative activities in either country both universities agree to negotiate a mutually acceptable solution.

6.3 Should any disagreement arise out of the application, interpretation or implementation of this Agreement, the universities shall endeavor to exercise best efforts to negotiate their differences.

7. **TERMINATION OF AGREEMENT**

This agreement may, at any time during its period of validity, be terminated by either party upon prior notice to the other in writing not later than **one** months before termination date, provided that such termination shall not affect the completion of any program or activity underway at the time the notice of termination is given.

8. **APPROVAL**

In agreement with the above terms of participation, the authorized representatives of the **President, Avanta foundation, Chopda.** and the **Bhagini Mandal chopda's Colleg of social work, chopda,Jalgaon** hereby affix signatures.

For: Avanta Foundation, Chopda,Jalgaon

05/09/2018

Manohar B Dhivare

Name and signature of representative

Date: 05/09/2018

अवंता फाउंडेशन
घडर्डि, ता. चोपडा,
जि. जळगांव, महाराष्ट्र ४२५

For: Bhagini Mandal Chopda's College of social work, Chopd, Dist-Jalgaon India

Name and signature of representative

Principal
Bhagini Mandal Chopda's
College of Social Work,Chopda

Date:

B.M.C.'S COLLEGE OF SOCIAL WORK Chopda Dist-Jalgaon

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन अनुदानित व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्नीत

Recognised by Govt. of Maharashtra & Affilated to KBC North Maharashtra University,Jalgaon (MS)

Govt.of Maharashtra Reg.Letter No. CSW.1094/12355/F.N.107/Sudhar.1 Dt.30/6/1994

'B' Grade NAAC Accredited (2.66)

University Affilation Letter No. NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994

भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा

फोन नं.(02586) 223017 मो.नं.9423903747

Bhagini Mandal Chopda's

# COLLEGE OF SOCIAL WORK CHOPDA

Phone No.02586-223017 M.No.9422783439

Principal-Dr.Ishwar M. Saundankar

President-Mrs.Poonam A. Gujarathi

**Outward No.BMCSW/76 /2018-19** **Date-07 /8 /2018**

प्रति

मा. अध्यक्ष

अवंता फाउंडेशन,

चहार्डी, ता. चोपडा,

जिल्हा जळगाव

**विषय :- आपल्या संस्थेसोबत सामंजस्य करार करणेबाबत**

महोदय,

आपणासोबत दिनांक02 /08 / २०18 आलेल्या अनौपचारिक चर्चेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येतेकी भगिनी मंडळ चोपडा संचालित समाजकार्य महाविद्यालय चोपडा जिल्हा जळगाव हे आपल्या संस्थेमार्फत पुढील चार वर्षासाठी सामंजस्य करार करू इच्छित आहे. आपला सोबत हा सामंजस्य करार करण्याचा मुख्य उद्देश

१) आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्षेत्र कार्य करण्याची संधी प्राप्त होणे

२) प्लेसमेंट करण्यासाठी संस्था मिळणे

३) आपल्या संस्थे मार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रम समन्वय व सहकार्याने राबवणे

४) महाविद्यालय व आपल्या संस्थेमार्फत संयुक्त विद्यमाने विविध प्रकल्प राबवणे

५) समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरीविषयक विषयक संधी आपल्या संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध होणे

आपणास विनंती आहे की आपण आमच्या महाविद्यालयासोबत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ शैक्षणिक ते वर्ष २१-२२ या कालावधीसाठी सामंजस्य करार करून आम्हाला सहकार्य करावे ही विनंती.

स्नेहादरान,

आपला विश्वासू,

(डॉ.ईश्वर एम.सौंदाणकर)

प्राचार्य,

भगिनी मंडळ चोपडा संचलित,

समाजकार्य महाविद्यालय चोपडा,

जि.जळगांव

धर्मादाय आयुक्त F- प्रमाण पत्र क्र.-१९१३८
नोंदणी क्र.- महा. /२०२१३ /जळगाव /२०१८ महाराष्ट्र राज्य

# अवंता फाउंडेशन

वहाडी, तालुका चोपडा, जिल्हा जळगाव महाराष्ट्र राज्य


अध्यक्ष - मनोहर हिवरे | Mob - 9049705029/7620702115
Email- avantafoundation2017@gmail.com | Email- manohardhivare@gmail.com


जा.क्र ०१ /२०१८ | दिनांक - 8 8 2018

(शिक्का: अवंता फाउंडेशन, Regd. No Maha/20213/ Jalgaon, वहाडी)

प्रति,
मा. प्राचार्य
समाजकार्य महाविद्यालय चोपडा

विषय :- आपल्या महाविद्यालया सोबत सामंजस्य करार करणे बाबत

संदर्भ :- मा. प्राचार्य समाजकार्य महाविद्यालय चोपडा BMCSW/76/1/2018-19 दिनांक - 7/8/2018 यांच्या कडील पत्र अन्वये

मोहदय,

आपल्या सोबत दिनांक 02/08/2018 रोजी झालेली अनौपचारिक चर्चा, तसेच आपल्या कडील दिनांक 7/8/2018 रोजी आलेल्या प्राप्त पत्रा नुसार आपल्या भगिनी मंडळ चोपडा संचालित समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जिल्हा जळगाव, तसेच आम्ही अवंता फाउंडेशन वहाडी, तालुका चोपडा जिल्हा जळगाव (सामाजिक संस्था) आम्हाला आपल्या पत्रातील सर्व अटी शर्ती मान्य असून त्या नुसार आपल्या सोबत सामंजस्य करार करण्यास उत्सुक आहोत, तयार आहोत.

श्री.मनोहर हिवरे
अध्यक्ष
अवंता फाउंडेशन
वहाडी, ता. चोपडा, जि. जळगाव

(शिक्का: अवंता फाउंडेशन, वहाडी, ता. चोपडा, जि. जळगांव, महाराष्ट्र राज्य)


कार्यालयीन पत्र व्यवहाराचा पत्ता- पोस्ट ऑफिस वहाडी, अवंता फाउंडेशन मनोहर हिवरे, [illegible] गौतम नगर, ता चोपडा जि. जळगाव पिन ४२५१०७ (गौतम नगर समाज मंदीर समोर)

## अवंता फाऊंडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा कौशल्य विकास प्रकल्पाची स्थापना व त्यामाध्यमातून रोजगार निर्मीती मार्गदर्शन

स्थापना – 01/10/2018

अवंता फाऊंडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा कौशल्य विकास प्रकल्पाची स्थापना करण्यासाठी आणि ग्रामीण विदयार्थी यांना विविध क्षेत्रातील रोजगार मिळण्याकरीता मोफत मार्गदर्शन करण्यासाठी क्षेत्र समन्वयक मा.संजय करंदीकर , मा संदीप शिंदे, मा.गजानन राठोड यांनी चोपडा व शिरपूर तालुका परिसरातील गावांमध्ये केलेल्या क्षेत्रभेटी च्या माध्यमातून आम्ही विविध गावांमध्ये जावून गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणी व अशिक्षित तरुण तरुणींना मोफत रोजगार मार्गदर्शन केले आहे व कमीत कमी वेळेत कोर्स करून रोजगार निर्मिती कशी होईल या वर भर दिला आहे





Principal
Shetkari Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

अध्यक्ष
अवंता फाऊंडेशन
पहाडी ता.चोपडा जि.जळगांव





अध्यक्ष
अवंता फाउंडेशन
चहार्डी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२९/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

## अवंता फाऊडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा शालेय किशोरवयीन विध्यार्थ्यासाठी समुपदेशन प्रकल्पाचे आयोजन केलेल्यां समुपदेशकांनासाठी प्रशिक्षण वर्ग

अवंता फाऊडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा शालेय किशोरवयीन विध्यार्थ्यासाठी समुपदेशन प्रकल्प करीता समुपदेशक म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाकरीता मुख्य प्रशिक्षक म्हणून मा.श्री. प्रशांत सोनवणे साहेब (पंचायत समिती चोपडा शिक्षण विभाग) तसेच संस्थेचे अध्यक्ष मनोहर ढिवरे, प्रकल्प व्यवस्थापक संजय करंदीकर, प्रकल्प समन्वयक स्वप्नाली करंदीकर, प्रा.संबोधी देशपांडे, प्रा.मोहिनी उपासनी तसेच समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी समुपदेशक सचिन सपकाळे, हरीश वाघ,विजय कोळी ,रोहन ढीवरे ,माधुरी ढीवरे ,मिथुन बारेला, कमिस बारेला, कुंदन सपकाळे,हर्षद वाघ,संदीप शिंदे,वसंत पवार विकेश पवरा,नीता सारवन, इ. समुपदेशक उपस्थित होते

ठिकाण – शासकीय विश्राम गृह चोपडा मिटिंग हॉल.







Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

अवंता फाऊंडेशन
चोपडा ता.चोपडा जि.जळगांव
नों.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव









अध्यक्ष
अयंता फाउंडेशन
वहाळी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२०/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव

## अवंता फॉऊडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हा परिषद शाळा चहार्डी येथील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम

दिनांक 13/07/2019 आज रोजी अवंता फॉऊडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हा परिषद शाळा चहार्डी येथील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सध्याची जिल्हा परिषद शाळांची अवस्था पाहता अवंता फाउंडेशन व समाजकार्य महाविद्यालयाने जि.प शाळेत विध्यार्थी संख्या वाढावी व शैक्षणिक साहित्य घेण्यासाठी पैसे नाहीत म्हणून विध्यार्थ्यांना शाळेपासून वंचित राहू लागू नये म्हणून 2018 पासून हा कार्यक्रम राबविण्यात सुरवात केली आहे. आजच्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून चहार्डी गावातील आदर्श व्यक्तिमत्त्व मा.श्री.व्ही.एन.पाटील सर व प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.शाळा चहार्डी केंद्र प्रमुख मा.श्री.नरेंद्र भाऊसाहेब, समाजकार्य महाविद्यालयातील प्रा.मोहिनी उपासनी, प्रा.संबोधी देशपांडे आम्हाला लाभले होते .ह्या कार्यक्रमाचे चहार्डी गावातील दान देणारे दाते 1) श्रीमती. कोकिळा राहुल रामटेके (कुर्ला) 2) कु.कोनिका गोकुळ करंदीकर 3) प्रा.निलिमा पाटील 4) प्रा.शैलेश पाटील हे कार्यक्रमासाठी उपस्थित होते.त्यांनी दिलेल्या मदतीने प्रत्येक गरजू शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाले पाहिजे हा आमचा उद्देश आहे ..

कार्यक्रमासाठी अवंता फाऊडेशन संस्थेचे अध्यक्ष व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी मनोहर ढिवरे, कार्यक्रम व्यवस्थापक संजय करंदीकर, कार्यक्रम समन्वयक स्वप्नाली करंदीकर, तसेच प्रा.संबोधी देशपांडे, प्रा.मोहिनी उपासनी, महाविद्यालयातील विद्यार्थी भुषण कोळी , रायसिंग कोळी प्रशांत पाटील सुधीर मोरे, रोहन ढिवरे, माधुरी ढिवरे,विजय कोळी समाजकार्यकर्ता मा. आधार करंदीकर साहेब यांनी परिश्रम घेतले आहेत ..अश्याप्रकारे कार्यक्रम संपन्न करण्यात आला ...



अध्यक्ष
अवंता फाऊंडेशन
चहार्डी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२९/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

**अवंता फाऊनडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा समुपदेशन प्रकल्प अंतर्गत ग्रामीण भागातील अकुलखेडा गावातील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अकुलखेडा**

अवंता फौंडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा समुपदेशन प्रकल्प अंतर्गत ग्रामीण भागातील अकुलखेडा गावातील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अकुलखेडा ,तालुका चोपडा, जिल्हा जळगाव , येथील शालेय किशोरवयीन विद्यार्थीनींना समुपदेशना बरोबरच सॅनिटरी पॅड चे वाटप करण्यात आले.

दिनांक 19/11/2019 रोजी अवंता फौंडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेरणा समुपदेशन प्रकल्प अंतर्गत ग्रामीण भागातील अकुलखेडा गावातील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अकुलखेडा ,तालुका चोपडा, जिल्हा जळगाव, येथील शालेय किशोरवयीन विद्यार्थीनींना समुपदेशन करण्यात आले . शालेय किशोरवयीन विद्यार्थीनींना प्रकल्प अंतर्गत ,किशोरवयीन लैंगिक शिक्षण, लैंगिक स्वच्छता, शारीरिक बदल मासिकपाळीच्या बाबतीत स्वच्छता, व्यक्तिमत्त्व विकास,स्व जागृती,वैयक्तिक स्वच्छता, रुबेला लसीकरण, शालेय पोषण आहार, अश्या विविध विषयांवर समुपदेशन करण्यात आले. तसेच किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप करून पॅड वापर करण्याचे फायदे व न वापर करण्याचे नुकसान ही समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमासाठी पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अकुलखेडा शाळेचे मुख्याध्यापक श्री.पी. एस. पाटील सर, तसेच शिक्षिका भारती चौधरी व स्वाती चौधरी, समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा.मोहिनी उपासनी, प्रा. संबोधी देशपांडे देखील उपस्थित होत्या.

तसेच अवंता फाउंडेशन या संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहर ढिवरे, सचिव प्रियंका ढिवरे , प्रेरणा समुपदेशन प्रकल्प समन्वयक स्वप्नाली करंदीकर, व प्रेरणा समुपदेशन प्रकल्प अंतर्गत कार्यरत समुपदेशक म्हणून समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी रोहन ढिवरे ,माधुरी ढिवरे, विजय कोळी यांनी समुपदेशन केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षण वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले..अश्याप्रकारे कार्यक्रमाची आज यशस्वीपणे सांगता करण्यात आली.






अध्यक्ष
अवंता फाउंडेशन
चहार्डी ता.चोपडा जि.जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda





अध्यक्ष
अथंता फाऊंडेशन
महाडी ता.चोपडा जि.जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

**अवंता फाऊंडेशन चहार्डी व भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या सयुंक्त विद्यमानाने चोपडा बसस्थानक आगारातील अधिकारी, व कर्मचाऱ्यांना मास्क वाटप व त्याचबरोबर महिला कर्मचाऱ्यांना सॅनिटरी पॅड वाटप**

संध्या जगभरात धुमाकूळ घातलेल्या कोविड19 या संसर्गजन्य विषाणूच्या पार्श्वभूमीवर आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना आखल्या जात आहेत. त्याच अनुषंगाने सामाजिक कार्यात अग्रेसर अवंता फाऊंडेशन व भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्याल चोपडा यांच्या माध्यमातुन चोपडा बस आगार अंतर्गत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी यांना दैनंदिन उपयोगासाठी फेस मास्कचे वाटप करण्यात आले....

कोरोनामुळे सर्वत्र भीती चे वातावरण आहे, राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी, कर्मचारी, बस चालक ,वाहक,मदतनीस (असि.आर्ट )यांना सदैव लोकांच्या संपर्कात राहावे लागते, बस वाहतूक बंद असली तरी चोपडा बसस्थानक येथे विविध अधिकारी कर्मचारी आपापल्या दैनंदिनी प्रमाणे उपस्थित आहेत, अश्या सर्व उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना मास्कचे वाटप व त्याचबरोबर संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी चे समुपदेशन व आव्हान करण्यात आले तसेच उपस्थित महिला कर्मचाऱ्यांना मास्क बरोबरच मासिक पाळी स्वच्छता विषयक उपयुक्त समुपदेशन करून अवंता फाऊंडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या माध्यमातून सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

आज च्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सन्माननीय श्री. संदेश क्षिरसागर (आगार व्यवस्थापक रा.प.चोपडा.) उपस्थित होते व त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय श्री. आधार करंदीकर साहेब सामाजिक कार्यकर्ते (चहार्डीकर. ) उपस्थित होते तसेच चोपडा आगारातील अधिकारी एम.एम. भालेराव (सहा.वाह.अधिक्षक) डी.डी.चावरे (व.लिपिक) रिना पाटील (लिपिक) राजश्री चव्हाण(लिपिक) वृषाली बैसाणे (लिपिक), सोनी पाटील (वाहक ),मनिषा ठाकरे(वाहक), भगवान न्हायदे, (पत्रकार ) आदी उपस्थित होते.

आज च्या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन अवंता फाऊंडेशन संस्थचे संस्थापकअध्यक्ष श्री.मनोहर भीमराव ढिवरे व संस्थेच्या प्रकल्प समन्वयक स्वप्नाली आधार करंदीकर मॅडम तसेच समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी रोहन युवराज ढिवरे,कुलदीप करंजे तसेच समाजकार्य महाविद्यालयातील प्रा.संबोधी देशपांडे, प्रा.मोहिनी उपासनी हे देखील उपस्थित होते.

अध्यक्ष
अवंता फाऊंडेशन
चहार्डी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव

**Principal**
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

B.M.C'S COLLEGE OF SOCIAL WORK





अध्यक्ष
अवंता फाउंडेशन
वहाडी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

B.M.C'S COLLEGE OF SOCIAL WORK





अध्यक्ष
अवंता फाऊंडेशन
घडाई ता.चोपडा जि.जळगांव
इजि.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

COLLEGE OF SOCIAL WORK

**जागतिक मासिकपाळी स्वच्छता दिनानिमित्त' चहार्डी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात समाजसेवा करणाऱ्या आशा स्वयंमसेविका यांना 'अवंता फाउंडेशन चहार्डी' व भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा मार्फत सॅनिटरी पॅड वाटप**

संध्या संपूर्ण भारत देशात कोविड-19 आजाराच्या परिस्थितीत सर्वत्र लॉक डाऊन आहे, अशा परिस्थितीत आपण सर्वच आपापल्यापरीने सामाजिक जनजागृती व विविध जबाबदाऱ्या पार पाडत आहोत. अशा परिस्थितीत 'आशा स्वयंम सेविका' यांचाही खूप अनमोल वाटा आहे. आणि म्हणून अवंता फाऊंडेशन चहार्डी व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या माध्यमातून आज दिनांक 28 मे 2021 रोजी जागतिक मासिकपाळी स्वच्छता दिनानिमित्त' चहार्डी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील खालील सर्व आशा स्वयसेविका यांना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले व त्याच बरोबर त्यांच्या कामाचे कौतुकही करण्यात आले.

| | |
|---|---|
| 1)मीना युवराज पाटील | 2)सुवर्णा दत्ता सैंदाणे |
| 3)अनिता मधुकर पाटील | 4)माया सुनील धनगर |
| 5)रेखाबाई प्रकाश पाटील | 6)मीनाक्षी प्रविणकुमार सोनवणे |
| 7)गिरीजाबाई मोहन महाजन | 8)मीनाक्षी रविंद्र पाटील |
| 9)विद्यादेवी माधव बाविस्कर | 10)सविता महेंद्र चौधरी |

आदी सर्व आशास्वयंसेविका कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ. प्रमिला प्रकाश पाटील सरपंच ग्रामपंचायत चहार्डी,उपसरपंच श्री. तुळशीराम धनराज कोळी व इतर ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते, त्याच बरोबर प्रमुख पाहुणे म्हणून अवंता फाऊंडेशन चे सदस्य सचिन सपकाळे तसेच समाजकार्य महाविद्यालयातील प्रा. संबोधी देशपांडे, प्रा.मोहिनी उपासनी देखील उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत चहार्डी व अवंता फाऊंडेशन व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्याकडून योग्य ते शारीरिक सुरक्षित अंतर (फिजीकल डीस्टन्स) बरोबरच सर्वांना खबरदारी पूर्वक फेस मास्क व सॅनिटायझर बाबत योग्य नियोजन केले गेले होते.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन अवंता फाऊंडेशन चे अध्यक्ष श्री.मनोहर ढिवरे व त्यांच्या सोबतीला अवंता फाऊंडेशन प्रकल्प समन्वयक स्वप्नाली करंदीकर, समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी रोहन ढिवरे, माधुरी ढिवरे,सचिन सपकाळे, प्रशांत पाटील यांनी मेहनत घेतली व कार्यक्रमाच्या शेवटी "आपण सर्व मिळून कोविड 19 विरुद्ध एकजुटीने व लढू शकतो, म्हणून घरातच रहा व सुरक्षित रहा!" असे संबोधून कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

अध्यक्ष
अवंता फाऊंडेशन
चहार्डी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२१/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

B M C'S COLLEGE OF SOCIAL WORK



अध्यक्ष
अथंता फाउंडेशन
महाडी ता.चोपडा जि.जळगांव
रजि.क्र.महाराष्ट्र/२०२९/जळगांव

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda